MHST010005392020

दाखल तारीख – १८.०२.२०२०
नोंदणी तारीख – २६.०२.२०२०
निकाल तारीख – १३.०७.२०२६
कालावधी – वर्ष – महिने – दिवस
०६ – ०४ – २४

<u>मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, सातारा</u>
(अध्यक्ष अरविंद शं. वाघमारे)
<u>मोटार अपघात नुकसान भरपाई मागणी अर्ज क्र. ५३/२०२०</u>

<u>निशाणी क्र. ५५.</u>

सौ. चित्रा शरद घिगे, वय वर्षे– ३७, धंदा– घरकाम. रा. मु.पो. घिगेवाडी, ता. कोरेगाव, जि.सातारा.	... **अर्जदार**

विरुध्द

१. **श्री. नितेश मानसिंग डेरे,** वय वर्षे – सज्ञान, धंदा–व्यापार, रा. सिध्देश्वर प्लाझा, प्लॉट क्र.२, यशवंतनगर, ता.वाई, जि.सातारा. २. **विभागीय व्यवस्थापक,** **दि न्यू इंडिया ॲश्युरन्स कं.लि.,** पत्ता– एल.आय.सी. बिल्डींग, कलेक्टर ऑफिसजवळ, सातारा.	... **सामनेवाले**

<u>अर्जदारांतर्फे वकील– श्री. एस.डी. भोसले.</u>
<u>सामनेवाला क्र.१ तर्फे वकील – श्री. एच.आर. शिंदे.</u>
<u>सामनेवाला क्र.२ तर्फे वकील – श्री. एम.एन. कुलकर्णी.</u>

<u>न्यायनिर्णय</u>
(जाहीर दिनांक १३ जुलै २०२६)

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी मोटार वाहन कायदा १९९४ चे कलम १६६ अन्वये मयत अक्षय गोविंद अनपट, वय २४ वर्षे याच्या अपघाती मृत्यूबद्दल रुपये ३२,८५,०००/– नुकसानभरपाई मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार ही मयताची बहिण आहे.

०२. सामनेवाला क्र.१ हे अपघातग्रस्त टेंपो क्र. एम.एच.११टी.५५०० चे मालक

असून अर्जदार क्र.२ ही विमा कंपनी आहे. (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर टेंपो'' असा करण्यात येईल.)

०३. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक दि.१७.०१.२०२० रोजी सकाळी ०९.३० च्या सुमारास मयत अक्षय हा मोटरसायकल क्र. एम.एच.११सी.सी.६५०४ वरुन वाठार–घिगेवाडी रस्त्याने प्रवास करत होता. (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर मोटरसायकल'' असा करण्यात येईल.) मौजे पिंपोडे बु।। गावच्या हद्दीत वाई ते वाठार रस्त्यावर सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीच्या सदर टेंपोचा चालक सदर टेंपो भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे, चुकीच्या दिशेने चालवित आला व मयत अक्षय प्रवास करत असलेल्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. सदर अपघातात अक्षय हा गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाला. अशाप्रकारे अपघात हा सदर टेंपो चालकाने निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे झालेला आहे.

०४. अपघातावेळी मयत अक्षय याचे वय २४ वर्षे होते. तो श्री जगदंब एंटरप्रायजेस, वाई यांच्यावतीने गरवारे वॉल रोप्स कं., वाई या कंपनीत नोकरीस होता. त्यास दरमहा रुपये १२,०००/– इतका पगार मिळत होता. तसेच तो शेती करत होता व त्यास शेतीतून दरसाल रुपये १,८०,०००/– इतके उत्पन्न मिळत होते. अर्जदार या मयत अक्षय याच्या उत्पन्नावर अवलंबून होत्या. या सर्व कारणांसाठी त्यांनी रुपये ३२,८५,०००/– नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

०५. सामनेवाला क्र.१ यांनी लेखी कैफियत निशाणी ९ लगत दाखल करुन अर्जदारांची कथने नाकारली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की,

अपघात सदर टेंपो चालकाच्या चुकीने झाला नसून सदर मोटरसायकल चालकाच्या चुकीने झाला आहे. अर्जदार यांनी सदर मोटरसायकलच्या मालकास पक्षकार म्हणून सामिल केले नसल्याने अर्जास आवश्यक पक्षकार सामिल नाहीत या तत्वाची बाधा येते. अपघातावेळी सदर टेंपो सामनेवाला क्र.२ या विमा कंपनीकडे विमाकृत होता. त्यांनी विमा पत्रातील अटी व शर्तींचा भंग केला नसल्याने नुकसान भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी सामनेवाला क्र.२ यांची आहे. त्यांनी मयताचे वय, व्यवसाय व उत्पन्न नाकारले आहे. या आणि इतर मुद्यांवर अर्जदारांचा दावा त्यांच्याविरुद्ध फेटाळण्यात यावा अशी सामनेवाला क्र.१ यांनी विनंती केली आहे.

०६. सामनेवाला क्र.२ सदर टेंपोची विमा कंपनी यांनी सदर प्रकरणामध्ये हजर होऊन त्यांची कैफियत निशाणी ३४ अन्वये दाखल केली असून असे कथन केले आहे की, अपघात हा सदर टेंपो चालकाच्या चुकीमुळे झाला नाही. अपघात हा सदर मोटरसायकल चालक यांच्या चुकीमुळे झालेला आहे. विकल्पेकरुन त्यांनी असे कथन केले आहे की, अपघातावेळी सदर मोटरसायकल चालकाकडे वाहन चालविणेचा वैध परवाना नव्हता, त्याने हेल्मेट घातले नव्हते. अशाप्रकारे अपघातात सदर मोटरसायकल चालकाचाही सहयोगी निष्काळजीपणा होता. सामनेवाला क्र.२ यांनी मयत अक्षय यांचे वय, व्यवसाय, त्यांचे दरमहा असलेले उत्पन्न, अर्जदारांचे मयतावर असलेले अवलंबित्व इत्यादि गोष्टी अमान्य केलेल्या आहेत व अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाहीत असे नमुद करुन त्यांच्याविरुध्द क्लेम अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०७. माझे पूर्वाधिकारी यांनी अर्जदार व सामनेवाले यांच्या कथना आधारे निशाणी १३ अन्वये मुद्दे निश्चित केले आहेत. त्या वाद प्रश्नांवर त्यालगत

माझे निष्कर्ष आणि त्यांची कारणमीमांसा खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

अ.क्र.	मुद्दे.	निष्कर्ष
१	दिनांक १७.०१.२०२० रोजी सकाळी ०९.३० वाजताचे सुमारास वाई–वाठार रस्त्यावर मौजे पिंपोडे बु।। गावचे हद्दीत टेंपो क्र. एम.एच.११टी.५५०० व मोटरसायकल क्र. एम.एच.११सी.सी.६५०४ या वाहनांच्या अपघातात अक्षय गोविंद अनपट मयत झाल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ?	होय.
२	टेंपो क्र. एम.एच.११टी.५५०० च्या चालकाने भरधाव व बेदरकारपणे टेंपो चालविल्याने अपघात झाल्याचे अर्जदार सिध्द करतात काय?	होय.
३	अर्जदार हे मागितलेल्या नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती व कोणाकडून ?	होय. अंतिम आदेशाप्रमाणे.
४	आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे.

कारणमीमांसा

०८. अर्जात केलेली विधाने सिद्ध करण्यासाठी अर्जदार यांच्यातर्फे खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आला.

१	प्रथम वर्दि अहवाल.	नि. १७
२	घटनास्थळ पंचनामा.	नि. १८
३	मरणोत्तर पंचनामा.	नि. १९
४	मृत्यूचा आगाऊ दाखला.	नि. २०
५	वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र.	नि. २१

६	विमा पॉलीसी.	नि. २२
७	फेरफार.	नि. २३
८	नमुना क्र.८अ चा उतारा.	नि. २४
९	७/१२ उतारे. एकूण ३.	नि. २५ ते २७
१०	नमुना क्र.८अ चा उतारा.	नि. २८
११	७/१२ उतारा.	नि. २९
१२	मयत अक्षय याच्या पगाराच्या पावत्या. एकूण ८.	नि. ४९

०९. अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ चित्रा शरद घीगे यांनी निशाणी १३ अन्वये पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. तसेच साक्षीदार क्र.२ प्रविण अंकुश कदम यांचा जबाब निशाणी ३६ अन्वये नोंदविला आहे.

१०. अर्जदार यांनी सादर केलेला पुरावा खोडून काढण्याकरीता सामनेवाला यांनी कोणताही साक्षीदार तपासला नाही.

११. अर्जदारांचे विधीज्ञ श्री. एस.डी. भोसले, सामनेवाला क्र.१ चे विधीज्ञ श्री. एच.आर. शिंदे आणि सामनेवाला क्र.२ यांचे विधीज्ञ श्री. एम.एन. कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला.

<u>मुद्दा क्रमांक १ ते ४</u> –

१२. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहेत.

१३. अर्जदार क्र.१ चित्रा शरद घिगे यांनी स्वतःला शपथेवर निशाणी १३ अन्वये तपासून तोंडी पुरावा दिला आहे. त्यांच्या अर्जातील कथने व त्यांचा तोंडी पुरावा याचे एकत्रीतरित्या वाचन करता असे दिसून येते की, मयत अक्षय हा सदर मोटरसायकल वरुन वाठार–घिगेवाडी रस्त्याने प्रवास करत असताना मौजे

---6

पिंपोडे बु।। गावच्या हद्दीत वाई ते वाठार रस्त्यावर सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीच्या सदर टेंपोचा चालक सदर टेंपो भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे, चुकीच्या दिशेने चालवित आला व मयत अक्षय प्रवास करत असलेल्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. सदर अपघातात अक्षय हा गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाला.

१४. सदरचा पुरावा हा सामनेवाला क्र.१ व २ यांनी उलटतपासाद्वारे आव्हानीत केला आहे. त्यांनी अपघात पाहिला नसल्याचे उलटतपासामध्ये कबुल केले आहे. अर्जदार यांनी अक्षय लहान असल्याने त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असल्याचेही कबुल केले आहे.

१५. सदर अपघाताची खबर शरद नामदेव घिगे यांनी दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरुन पोलीसांनी सदर टेंपो चालकाविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४(अ) अन्वये गुन्हा दाखल केल्याचे दिसून येत आहे. तसेच पोलीसांनी दि. १७.०१.२०२० रोजी अपघातस्थळास भेट देऊन निशाणी १८ कडील पंचनामा केलेला दिसून येत आहे.

१६. सदर प्रकरणामध्ये सदर टेंपो हे वाहन सदर मोटरसायकल पेक्षा जड वाहन आहे. अशा वेळी जड वाहनाच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन काळजीपूर्वक चालविणे अभिप्रेत असते. जर सदर टेंपो चालकाने आपली जबाबदारी व्यवस्थीतरित्या पार पाडली असती तर अपघाताची बाब टळू शकली असती. याउपर येथे असे नमुद करणे आवश्यक आहे की, सदर अपघात हा मयत अक्षय व सदर टेंपो चालक यांच्या माहितीतील होता. सबब, सदर टेंपो चालक हे सुध्दा सदर अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. परंतु सदर टेंपो चालक यांना सामनेवाला क्र.२ यांनी साक्षीदार म्हणून तपासले नाही.

१७. गुन्ह्याची पहिली वर्दि (निशाणी १७) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर अपघातामध्ये मयत अक्षय यास गंभीर जखमा होऊन मृत्यू झाला आहे. तसेच मरणोत्तर पंचनामा (नि.१९) आणि शवविच्छेदन अहवाल (नि.२०) मध्ये रस्ते अपघातात मयत अक्षय यास विविध जखमा होऊन त्याचा मृत्यू झाल्याचे दिसून येत आहे. वर चर्चा केल्याप्रमाणे सदर अपघात हा सदर टेंपो चालकाच्या चुकीने झाल्याचे सिद्ध होते. सबब, सामनेवाला क्र.२ यांच्या विधीज्ञांनी युक्तीवादात कथन केल्याप्रमाणे प्रस्तुतचा अपघात मयत अक्षय यांच्या सहयोगी निष्काळजीपणामुळे झाल्याचे सिद्ध होत नाही.

१८. आता असा प्रश्न उपस्थित होतो की, अर्जदार यांनी मागितलेली नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती व कोणाकडून? अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे मयत अक्षय याचे वय अपघातावेळी २४ वर्षे होते. हे दाखविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. निशाणी १९ कडील मरणोत्तर पंचनाम्यात मयत अक्षय याचे वय २५ वर्षे नमुद आहे. त्यामुळे अपघातावेळी त्याचे वय वर्षे २५ होते हे लक्षात घ्यावे लागते. माननीय सर्वोच्च न्यायालयाचे ***सरला वर्मा वि।। दिल्ली ट्रान्स्पोर्ट कं. व इतर, २००९(२) टीएसी ६७७*** या न्यायनिर्णयातील निरिक्षणानुसार वयोगट २१ ते २५ साठी "१८'' हा गुणांक या प्रकरणामध्ये लागू होतो.

१९. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, मयत अक्षय हा श्री जगदंब एंटरप्रायजेस, वाई यांच्यावतीने गरवारे वॉल रोप्स कं., वाई या कंपनीत नोकरीस होता. त्यास दरमहा रुपये १२,०००/- इतका पगार मिळत होता. तसेच तो शेती करत होता व त्यास शेतीतून दरसाल रुपये १,८०,०००/- इतके उत्पन्न मिळत होते. मयत अक्षय याच्या नोकरीपासूनच्या उत्पन्नाच्या शाबीतीसाठी अर्जदार यांनी श्री जगदंब एंटरप्रायजेसचे व्यवस्थापक श्री.प्रविण अंकुश कदम यांचा

पुरावा निशाणी ३६ अन्वये नोंदविला आहे. त्यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, मयत अक्षय हा त्यांच्या कंपनीच्या वतीने गरवारे टेक्नीकल फायबर्स लि. या कंपनीत नोकरीस होता. त्यांच्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी निशाणी ४९ अन्वये मयत अक्षय याच्या माहे मे–२०१९ ते डिसेंबर–२०१९ या कालावधीतील पगार पत्रके दाखल केली आहेत. त्यामध्ये अतिकालीक भत्त्याची रक्कमही समाविष्ट आहे. वास्तविक पाहता वेतनाची गणणा करताना कर्मचाऱ्याचे मुळ वेतन, महागाई भत्ता व घरभाडे भत्ता या रकमांची गणणा करणे आवश्यक आहे. प्रस्तुतकामी अर्जदार यांनी निशाणी ४९ अन्वये मयत अक्षय याच्या ८ महिन्यांची पगार पत्रके सादर केली आहेत. माहे डिसेंबर–२०१९ च्या पगार पत्रकान्वये मयत अक्षय यास अतिकालीक भत्ता रुपये ४४६७/– वजा जाता रुपये ७,७५२/– इतका पगार मिळत असल्याचे दिसून येते. अतिकालिक भत्ता हा नियमित उत्पन्नाचा भाग म्हणून गृहित धरता येणार नाही. त्याप्रमाणे मयत अक्षय याचे पगारापासूनचे उत्पन्न व्यवसाय कर रुपये २००/– वजा जाता दरमहा रुपये ७,५५२/– इतके गृहित धरता येईल.

२०. अर्जदार यांनी मयत अक्षय शेती करत होता व त्यास शेतीतून दरसाल रुपये १,८०,०००/– इतके उत्पन्न मिळत होते असे कथन केले आहे. त्यापुष्ठ्यर्थ निशाणी २३ ते २९ अन्वये शेतजमीनीचे उतारे सादर केले आहेत. सदरील उताऱ्यांचे अवलोकन करता सदर शेत जमीनीतून मयत अक्षय पिकांचे उत्पन्न घेत होते असे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदाराचे शेतीपासूनच्या उत्पन्नाचे नुकसान झाल्याची बाब मान्य करता येणार नाही.

२१. मयत अक्षय यांच्यावर अर्जदार एकट्याच अवलंबून असल्याने मयताच्या वैयक्तीक खर्चाकरीता १/२ रक्कम वजा करणे योग्य ठरते. मयत अक्षय हे नोकरी करत असल्याने त्यांचे नोकरीपासूनचे उत्पन्न विचारात घेणेत आले आहे.

सबब, वर चर्चा केल्याप्रमाणे अपघात समयी मयत अक्षय यांचे वय २५ वर्षे असल्याने ***नॅशनल इंशुरंस कं.लि. विरुध्द प्रणय सेठी, २०१७ ए.सी.जे.२७००*** या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालपत्रातील निर्देशाप्रमाणे मयताचे भविष्यातील उत्पन्नाची वाढ ५० टक्के विचारात घ्यावी लागेल. तसेच मयताचे वयानुसार १८ चा गुणांक लागू होईल.

२२. आता हे पहावे लागेल की, अर्जदार या मयत अक्षय याच्या वारस होत्या का? तसेच त्या त्याच्या उत्पन्नावर अवलंबून होत्या की नाही? या मुद्यांवर अर्जदाराच्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान असे कथन केले की, मयत अक्षय हा त्याची बहिण म्हणजेच अर्जदारासोबत राहत होता. निशाणी १७ कडील प्रथम वर्दि अहवालाचे अवलोकन करता अर्जदाराच्या पतीनेच फिर्याद दिल्याचे दिसून येते. येथे हे नमुद करावेसे वाटते की, मयत अक्षय याचे आई–वडील असते तर त्यांनी अर्ज दाखल केला असता. निशाणी २३ कडील फेरफार पत्रकाचे अवलोकन करता मयत अक्षय याचे आई–वडिल मयत असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार यांनी निशाणी ५४ सोबत दाखल केलेल्या रेशनकार्डमध्येही मयत अक्षय व्यतिरिक्त इतर कोणाचीही नावे नमुद नसल्याचे दिसते.

२३. सामनेवाला क्र.२ च्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान असे कथन केले की, अर्जदार ही मयत अक्षय याची बहिण असल्यामुळे व ती विवाहीत असून मयत अक्षय याच्यावर अवलंबून नसल्याने मोटर वाहन कायदा १९९४ चे कलम १६६ अन्वये नुकसानभरपाईची मागणी करु शकत नाही. निशाणी २३ कडील फेरफार पत्रकाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अविवाहीत असतानाच अक्षय याचा मृत्यू झाला असून त्याचे आई–वडिल मयत असल्याने अर्जदार याच त्यांच्या वारस आहेत.

२४. अर्जदार या मयत अक्षय याच्या कायदेशीर वारस असून मयत अक्षय सोबत राहत असल्याचे दाखविण्यासाठी अर्जदार यांनी निशाणी ५४ सोबत रेशन कार्ड दाखल केले आहे. रेशन कार्डचे अवलोकन करता त्यामधून "चंद्रसेना गोविंद अनपट'' यांचे नाव दि.२०.१०.२०१६ रोजी कमी करणेत आल्यानंतर रेशनकार्डमध्ये फक्त मयत अक्षय गोविंद अनपट याचे नाव नमुद असल्याचे दिसून येते. तसेच त्यामध्ये त्याचा पत्ता अनपटवाडी, ता. कोरेगाव, जि.सातारा असा नमुद असल्याचे दिसते. तथापी अर्जदाराने अर्जात नमुद केलेला पत्ता घिगेवाडी, ता. कोरेगाव, जि.सातारा असा नमुद आहे. यावरुन अर्जदार या विवाहानंतर अर्जात नमुद पत्त्यावर राहण्यास आहे व मयत अक्षय हा अर्जात नमुद पत्त्यावरच राहत असल्याचे दिसून येत नाही.

२५. जरी अर्जदार या मयत अक्षय याच्या कायदेशीर वारस असल्या तरी अर्जदार यांनी त्यांच्या निशाणी १३ कडील उलटतपासामध्ये मयत अक्षय हा लहान असल्यामुळे त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असल्याचे व त्या मयत अक्षय याच्या उत्पन्नावर अवलंबून नसल्याचे स्पष्टपणे कबुल केले आहे. तसेच प्रस्तुतचा अपघात दि.१७.१.२०२० रोजी झाला असून अपघाताच्या दिवशी निशाणी ५४ सोबतच्या रेशनकार्डमध्ये मयत अक्षय याच्या व्यतिरिक्त इतर कोणाचेही नाव नमुद असल्याचे दिसत नाही. यावरुन अपघाताचे वेळी अर्जदार या मयत अक्षय याच्यासोबत राहत असल्याची व त्याच्या उत्पन्नावर अवलंबून असल्याची बाब शाबीत होत नाही.

२६. वर नमुद सर्व बाबींचा विचार करता अर्जदार या मयत अक्षय याच्या कायदेशीर वारस असल्या तरी त्याच्या उत्पन्नावर अवलंबून असल्याचे शाबीत होत नाही. त्यामुळे अर्जदार या फक्त सहवासाचे नुकसान, संप्पत्तीचे नुकसान व अंत्यविधी या बाबींसाठी खालीलप्रमाणे नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहेत.

१.	लॉस ऑफ कंसोरटिअम (सहवासाचे नुकसान) (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ४०,०००/– वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ४८,००० x १.)	रुपये ४८,०००/–
२.	लॉस ऑफ इस्टेट (संपत्तीचे नुकसान) व अंत्यविधी या करीता खर्च एकत्रीतपणे रुपये ३०,०००/–. (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ३०,०००/– वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ३६,०००/–)	रुपये ३६,०००/–
	नुकसान भरपाईची अंतिम रक्कम. (अ.क्र.१ ते २)	**रु. ८४,०००/–**

२७. सामनेवाला क्र.१ यांनी सामनेवाला क्र.२ यांचेकडे सदर टेंपोचा विमा दि.१३.०७.२०१९ ते १२.०७.२०२० या कालावधीकरीता उतरविला होता. अपघात दि.१७.०१.२०२० रोजी झाला असल्याने अपघात समयी विमा पॉलीसी वैध होती. अर्जदार यांना मयत अक्षय गोविंद अनपट याच्या अपघाती मृत्यूबाबत वरीलप्रमाणे विविध तपशिलांसाठी नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ व २ यांची वैयक्तीक व संयुक्तिक आहे. अर्जदार हे वरील रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून द.सा.द.शे. ९ टक्के दराने व्याज मिळण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर "होय" असे नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्जदार यांचा मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करणेत येतो.

२. सामनेवाला क्र.१ व २ हे वैयक्तीक व संयुक्तीकरित्या अर्जदार यांना

अंतरीम नुकसानभरपाईच्या रकमेसह एकूण नुकसान भरपाई रक्कम रुपये ८४,०००/– (रक्कम रुपये चौऱ्याऐंशी हजार फक्त) व त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा.द.शे. ९ टक्के व्याज दराने देण्यास बांधील आहेत.

३. सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारांना देण्याकरीता वरील रक्कम वाहन अपघात दावा न्यायाधिकरण यांचे बँक खाते क्रमांक ४०८२७५२६३३३, IFSC कोड क्र. SBIN–0010713 मध्ये जमा करावी.

४. नुकसान भरपाईची व्याजासह येणारी संपूर्ण रक्कम अर्जदार यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पध्दतीने वर्ग करण्यात यावी.

५. अर्जदार यांनी नुकसान भरपाईची रक्कम वर्ग करण्यासाठी त्यांचा बचत खाते क्रमांक, पॅन क्रमांक आणि आधार क्रमांक सादर करावा.

६. अर्जदार यांनी अदा केलेले न्यायीक शुल्क कमी असल्यास, कमी असलेले न्यायीक शुल्क अर्जदार यांनी १५ दिवसांत अदा केल्यानंतर आदेश अंमलात येईल. न्यायीक शुल्क देण्यास विलंब झाल्यास आदेशाच्या तारखेपासून न्यायीक शुल्काची रक्कम अदा करे पर्यंतच्या कालावधीत नुकसान भरपाईच्या रकमेवर व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहणार नाहीत.

७. येणेप्रमाणे अंतिम हुकुमनामा करणेत यावा.

ARVIND WAGHMARE

Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2026.07.13 17:36:31 +0530

(अरविंद शं. वाघमारे)

दि. १३ जुलै २०२६

अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.